# कार्यसूची - एक

**खात्याची कार्ये आणि कर्तव्ये याबाबतचा तपशिलः-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिक्षेत्रात खालील अधिनियमांची अंमलबजावणी करणे हे दुकाने व आस्थापना खात्याचे मुख्य कार्य आहे.

1. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, 2017.
2. बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, 1986
3. महाराष्ट्र शासनाकडून मुंबई महानगरपालिकेला अंमलबजावणीकरिता सोपविण्यात आलेले इतर कामगार कायदे .
4. महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियत्रंण) अधिनियम, 2006 व महाराष्ट्र प्लास्टिक कॅरीबॅग्ज (उत्पादन व वापर) नियम 2006, व महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूचे (उत्पादन,वापर,विक्री,वाहतूक,हाताळणी, साठवणूक) अधिसुचना 2018

विविध प्रवर्गातील जसे दुकाने, वाणिज्यिक आस्थापना, निवासी हॉटेल्स आणि उपहारगृहे व भोजनगृहे, चित्रपटगृहे आणि इतर करमणूकीचे केंद्रे इ. प्रकारच्या आस्थापनांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या कामाची स्थिती आणि रोजगाराबाबत नियमन करणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम 2017 नियम 28 मध्ये तरतूद केल्यानुसार कामगार आयुक्त, मुंबई व अन्य प्राधिकृत अधिका-यांमार्फत अधिनियमाच्या अंमलबजावणी कामावर उच्चस्तरीय पर्यवेक्षण करतात.

वरिष्ठ सुविधाकारांनी व सुविधाकारांनी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने शासनाने व महानगरपालिका प्रशासनाने ठरविलेल्या धोरणाची अंमलबजावणी विभाग स्तरावर करणे. अधिनियमाच्या कलम 28 अन्वये नेमणूक केलेल्या सुविधाकाराला विविध आस्थापनांमधील कर्मचा-यांचा अभियोक्ता म्हणूनच केवळ काम करावयाचे नसून व्यापार उदिम किंवा व्यवसाय सुरळीत चालण्याच्या उद्देशाने मालक व कामगार यांच्यामधील संबंध जिव्हाळ्याचे राहतील याबाबतही त्याला लक्ष पुरवावे लागते. भारतीय दंड संहितेच्या कलम 21 अनुसार त्याला लोकसेवक म्हणून समजले जाते. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम 2017 व त्याखालील नियमाच्या विविध तरतुदिंच्या भंगाबाबत त्याने दोषीविरुध्द दाखल केलेली प्रकरणे चालविण्याकरिता ज्यावेळी तो न्यायालयात उभा राहतो त्यावेळी तो सहाय्यक सरकारी अभियोक्त्याची भुमिका बजावत असतो. विविध तरतूदींच्या उल्लंघनाबाबत दाखल केलेल्या प्रकरणात तो न्यायालयात वाद प्रतिवाद करतो.

खात्याचे मनुष्यबळ:-

महानगरपालिकेचे खाते असल्याने महानगरपालिका प्रशासनाला आणि कामकाजावर राज्य शासनाचे पर्यवेक्षकीय नियंत्रण असल्यामुळे राज्य शासनाला प्रमुख अधिकारी, दुकाने व आस्थापना जबाबदार असतात. खात्यातील खालील कर्मचा-यांच्या कामकाजावर त्यांचे पर्यवेक्षण असते.

1. प्रमुख अधिकारी, दुकाने व आस्थापना - 1
2. उप प्रमुख सुविधाकार, दुकाने व आस्थापना - 4
3. वरिष्ठ सुविधाकार, दुकाने व आस्थापना - 38
4. सुविधाकार, दुकाने व आस्थापना - 109
5. मुख्य लिपिक — 2
6. लिपिक — 12
7. जेष्ठ दुकान परिचर — 7
8. दुकान परिचर — 54
9. नाईक — 1
10. शिपाई — 3

प्रमुख अधिकारी (दुकाने व आस्थापना) हे या खात्याचे मुख्य आहेत. मुख्यालय स्तरावर चार उप प्रमुख सुविधाकार (दुकाने व आस्थापना), दोन मुख्य लिपिक, लिपिक व शिपाई हे त्यांना कामकाजात सहाय्य करत असतात. खात्याचे अंमलबजावणी कामकाज हे प्रत्येक विभागातील वरिष्ठ सुविधाकार (दुकाने व आस्थापना) यांचे मार्फत चालविले जाते. वरिष्ठ सुविधाकार (दुकाने व आस्थापना) यांना त्यांच्या कामात सुविधाकार, वरिष्ठ दुकान परिचर व दुकान परिचर मदत करतात. सुविधाकारांची संख्या त्या विभागात नोंदीत आस्थापनांच्या संख्येवर अवलंबून असते. विविध विभागांमध्ये कार्यरत वरिष्ठ सुविधाकार, सुविधाकार, वरिष्ठ दुकान परिचर व दुकान परिचर हे सहाय्यक आयुक्तांच्या कार्यालय संरचनेत काम करत असतात. तथापि, त्यांचे कामाचे पर्यवेक्षण प्रमुख अधिकारी (दुकाने व आस्थापना) यांचे मार्फत केले जाते.

खात्याचे प्रशासकीय मुख्यालय हे प्रमुख अधिकारी, दुकाने व आस्थापना यांचे कार्यालय, 5वा मजला, हॉकर्स प्लाझा इमारत, सेनापती बापट मार्ग, दादर (प.) मुंबई 400028, दुरध्वनी क्र. 022-224311751 येथे आहे.

## दुकाने व आस्थापना खात्याची रचना

